# आचारसंहिता आणि नीतितत्त्वे
# काळजीपुर्वक संपर्काचे धोरण

ETHICS & LEGAL COMPLIANCE | ISSUED: May 1, 2014 – REVISED: December 13, 2021

हे धोरण, कर्मचाऱ्यांना मदत करण्याकरिता आणि Magna च्या बाजूने कार्य करणाऱ्यांकरिता, ज्यात अधिकारी, संचालक, सल्लागार आणि एजंट समाविष्ट असतील, व ज्यांना सगळ्याच संपर्कामध्ये दक्षता आणि व्यावसायिकतेचे महत्त्व माहिती असेल अशांकरिता बनविले गेले आहे. असे केल्याने अयोग्य पत्रव्यवहारांमुळे होणाऱ्या संभाव्य नकारात्मक परिणामांपासून तुमचे आणि Magna चे संरक्षण होण्यास मदत होईल.

हे धोरण Magna International Inc. आणि तिच्या सर्व कार्यरत समूह, विभाग, संयुक्त उपक्रम आणि इतर जागतिक कार्यक्रमांना लागू होते (एकत्रितरित्या “Magna”).

## परिचय

Magna मध्ये, आमच्या कर्मचाऱ्यांनी सर्व पत्रव्यवहारांमध्ये व्यावसायिक आणि स्पष्ट असण्यास आणि पत्रव्यवहाराचा सर्वोत्तम मार्ग काळजीपूर्वक विचारात घेण्यास आम्ही प्रोत्साहन देतो. गुंतागुंत, निकड आणि संवेदनशीलतेनुसार, भिन्न विषय कळवण्यासाठी भिन्न मार्ग आवश्यक असतील, जसे की वैयक्तिक बैठका, तसेच दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा भिन्न प्लॅटफॉर्म्सवर आभासी संवाद. ठराविक उद्देशांसाठी प्रत्येक प्रकारचा संवाद अनुरूप असू शकतो. प्रसंगानुसार कोणता प्रकार सुयोग्य आहे याचा विचार करण्यास तुम्ही वेळ दिला पाहिजे.

आपण लेखी स्वरूपात संपर्क साधत असाल तर, संपर्क हा मुद्याला आणि प्रेक्षक वर्गाला धरून असेल याची खात्री करा. कोणत्याही स्वरूपातील लेखी संवाद करताना, विषयाचा बारकाईने विचार करा आणि शब्दांचा अर्थ कसा लावला जाऊ शकतो याचा अंदाज घ्यावा (लौकिक दृष्टिकोनातून, कायदेशीर कार्यपद्धतींमध्ये किंवा अन्यथा). काळजी घ्यावी, व्यावसायिक राहावे आणि अतिशयोक्ती किंवा अयोग्य अनुमान टाळावे

## संपर्काचा दर्जा

जेव्हा तुम्ही लेखी संवाद करता, तेव्हा याची खात्री करावी:

- प्रेक्षक वर्ग माहिती असून त्याची पडताळणी केली आहे. पत्रव्यवहाराचा प्राप्तकर्ता तपासा - ईमेल पत्त्यांचे काळजीपूर्वक पूनरावलोकन करावे आणि “Reply All” वैशिष्ट्य विचारपूर्वक वापरावे. संदेशाच्या प्रत्येक प्राप्तकर्त्याची भूमिका समजावून घ्यावी आणि आवश्यकतेपेक्षा जास्तीची माहिती (संलग्नकांसह) पाठवू नये. अंतर्गत संदेश Magna मध्येच ठेवावे.

- आपल्या सगळ्या संपर्कांमध्ये व्यावसायिकता दर्शवा. आपल्या निरोपाचे घटक आणि कार्यक्षमता योग्य असल्याची खात्री करा. सर्व आवश्यक संदर्भ प्रदान करावे आणि तुमचा संवाद वृत्तपत्र किंवा इंटरनेटवर उघड झाल्यास काय प्रतिक्रिया येतील याचा विचार करावा.
- स्पर्धकांसह संवाद करताना अतिशय सावध राहावे. या विषयावरील अधिक माहितीसाठी, कृपया Magna च्या अँटिव्हायरस आणि स्पर्धेबाबत धोरणाचा संदर्भ घ्यावा.
- खाजगीत्व, गोपनीयता आणि कायदेशीर विशेषाधिकारांचा (लागू असेल तिथे) आदर करावा. कायदेशीर विशेषाधिकार असलेला संवाद म्हणजे तुम्ही आणि अंतर्गत किंवा बाह्य वकील यांच्यातील संवाद जो खटला किंवा कायदेशीर सल्ल्याशी संबंधित असू शकतो.

## उपयुक्त टिपा

## खालील गोष्टींबद्दल सावध रहा...

- स्पर्धात्मक संवेदनशील माहिती समाविष्ट असलेला किंवा स्पर्धा कमी करण्यासाठी स्पर्धकांसह समन्वय साधण्याचा प्रयत्न असा अर्थ लावला जाऊ शकतो असा कोणताही संवाद, जसे की किमती, बोली, बाजारपेठा किंवा ग्राहक वाटप किंवा Magna च्या अँटिव्हायरस आणि स्पर्धेबाबत धोरणाचे उल्लंघन करू शकतील असे कोणतेही विषय समाविष्ट असलेला संवाद.
- तुमच्या ज्ञान किंवा कौशल्याबाहेरील मते देणे - अनुमान लावू नये किंवा गृहीत धरू नये! ज्याबाबत तुम्हाला स्वतःला माहिती आहे तीच स्पष्टपणे नमूद करावी. तुमच्या ज्ञान किंवा कौशल्याबाहेरील बाबी संबोधित करण्यासाठी इतरांना समाविष्ट करावे.
- कायदेशीर समस्या - तुम्ही संवाद करत असलेला विषय कायदेशीर समस्या निर्माण करतो का याबाबत तुम्हाला खात्री नसल्यास, तुमचे गट, प्रादेशिक आणि/किंवा कॉर्पोरेट कायदा वकिलांना समाविष्ट करा आणि त्याच्यासह तुमच्या पत्रव्यवहारास "विशेषाधिकार प्राप्त आणि गोपनीय" अशी खूण करा.
- Magna चे कर्मचारी आणि त्यांच्यावतीने काम करणारे यांनी Magna चा अपमान करू नये किंवा कोणतीही गोपनीय माहिती देऊ नये असे अपेक्षित आहे - ही कर्तव्य सामाजिक प्रसारमाध्यमाकरिता लागू होते. सामाजिक प्रसारमाध्यमाद्वारे केलेला संपर्क हा खाजगी समजला जाऊ नये, अगदी युझर सेटिंग्ज विचारात न घेता. अधिक माहितीकरिता, कृपया Magnaच्या ग्लोबल ई-मेल, इंटरनेट आणि सामाजिक प्रसार धोरणाचा संदर्भ घ्या.

## कधीही नाही...

- अती आश्वासन - वास्तववादी राहावे.
- अस्वस्थ असल्यास मेसेज पाठवा; त्यापेक्षा, तो काही काळाकरिता जतन करता आणि मग पाठवण्यापूर्वी त्याचा नीट आढावा घ्यावा आणि मग पाठवावा. दुसऱ्याचे मत घेण्याचा विचार करावा.
- नकारात्मक पद्धतीने भागधारकांशी चर्चा करणे - व्यावसायिक राहावे.
- पक्षपाती किंवा त्रासदाय असलेले मेसेज पाठविणे किंवा फॉर्वर्ड करणे. तुम्हाला असा पत्रव्यवहार प्राप्त झाला, तर तुमचे पर्यवेक्षक किंवा व्यवस्थापक, मानव संसाधन विभाग, समूह, प्रादेशिक किंवा कॉर्पोरेट वकील, अंतर्गत ऑडिट किंवा नैतिक आणि कायदा अनुपालन विभाग यांच्याकडून मदत मागावी. अधिक माहितीसाठी कृपया Magna च्या छळ आणि भेदभाव धोरणांचा संदर्भ घ्यावा.

## कंपनीची माहिती

Magna किंवा तुमच्या कामाशी संबंधित कोणताही संवाद ही कंपनी माहिती मानली जाऊ शकते हे लक्षात ठेवावे (मग तो कागदावर, इलेक्ट्रॉनिक, ऑडिओ किंवा अन्य स्वरूपात असला तरीही). कंपनीची माहिती Magna च्या व्यवसायासाठी महत्त्वाची आहे - तिचे अंतर्गत आणि बाह्यरित्या पुनरावलोकन केले जाऊ शकते (यामध्ये अंतर्गत आणि बाह्य लेखापरीक्षक, शासकीय संस्था किंवा तपासक आणि खटले व इतर कायदेशीर कार्यपद्धतींमध्ये पुराव्याचा आढावा घेणारे वकील यांसह).

कोणतीही संभाषणे किंवा संवाद हे “ऑफ-द-रेकॉर्ड” नसतात आणि हटवलेले काहीही पुनर्प्राप्त करता येते हे गृहीत धरा.

काळजीपुर्वक पद्धतीने संपर्क साधल्यास, आपण Magnaचीच ख्याती राखणार नसून स्वत:ची देखील जतन करणार आहात.

## कॉर्पोरेट प्रकटीकरण

आपले काम करत असताना, आवश्यक असलेल्या व्यतिरिक्त, Magnaच्या कर्मचाऱ्यांनी कंपनीच्या बाबींवर चर्चा करायला नको, विशेषत: “समाजाकरिता नसलेली माहिती”, अशा बाबी कोणत्याही व्यक्तीस सांगू नये (मित्रपरिवार, नातेवाईक आणि इतर Magna चे कर्मचारी ज्यांना माहिती असण्याची आवश्यकता नाही). याशिवाय, “अधिकृत प्रवक्ता” असल्याशिवाय, Magna कर्मचाऱ्यांना मिडिया, उद्योगातील व्यावसायिक किंवा Magna च्या भागधारकांसह कंपनीच्या विषयांवर चर्चा करण्याचे अधिकार नाहीत. अधिक तपशीलवार माहितीसाठी, कृपया Magna च्या कॉर्पोरेट प्रगटन धोरण आणि Magna च्या मिडिया धोरणाचा संदर्भ घ्यावा.

## माहितीची गोपनीयता आणि संरक्षण

हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की संवादामध्ये वैयक्तिक माहितीचा समावेश असतो जो Magna द्वारे संरक्षित असणे आवश्यक आहे. वैयक्तिक माहिती जितकी आणि जेवढी आवश्यक आहे तेवढीच अधिकृत कर्मचाऱ्याला देण्यात यावी. कोणत्याही माहिती सुरक्षाविषयक घटना घडू नयेत या करिता Magna च्या सुरक्षा नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. अधिक मार्गदर्शनासाठी, कृपया Magna च्या डेटा खाजगीत्व धोरण आणि संबंधित प्रक्रियांचा संदर्भ घ्यावा.

## अधिक माहितीसाठी:

अधिक माहिती किंवा सल्ल्यासाठी, कृपया तुमच्या समूह किंवा प्रादेशिक कायदा वकील, प्रांतिय अनुपालन अधिकारी, Magna चे उपाध्यक्ष, नैतिक आणि प्रमुख अनुपालन अधिकारी किंवा कॉर्पोरेट संवाद आणि मिडिया संबंध उपाध्यक्षांशी संपर्क साधावा.

---


| | |
|---|---|
| Issued: | May 1, 2014 |
| Revised: | December 13, 2021 |
| Next Review: | Q4 2024 |
| Issued By: | Ethics & Legal Compliance |
| Approved By: | Chief Compliance Officer, on behalf of Magna Compliance Council |